दयानंद शिक्षण संस्था,लातूर

आ नो भद्रा: क्रतवो यन्तु विश्वत:

## दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

# मासिक ई-मॅगझीन

APR 2026

### महिना : एप्रिल २०२६

**महाविद्यालयात**
**आयोजित विविध शैक्षणिक, सांस्कृतिक,**
**क्रीडा व सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर करणारे**
**मासिक ई-मॅगझीन.**










No : 1234567890000000000

# दयानंद कला महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथालय भेट; विद्यार्थ्यांत वाचन संस्कृतीला चालना

जागतिक पुस्तक दिनानिमित्त दयानंद कला महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विशेष ग्रंथालय भेटीचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांच्या पुढाकारातून उत्साहात पार पडला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि ग्रंथालयाशी त्यांचा अधिक जवळचा संबंध प्रस्थापित करणे हा होता. दरवर्षी २३ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा जागतिक पुस्तक दिन हा दिवस वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. २३ एप्रिल हा दिवस विल्यम शेक्सपियर, आणिइंका गार्सिलासो दे ला वेगा यांसारख्या महान साहित्यिकांच्या स्मृतीशी संबंधित असल्यामुळे या दिवसाचे विशेष महत्त्व आहे.

ग्रंथालय भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध विषयांवरील पुस्तके, संदर्भग्रंथ, नियतकालिके यांची माहिती देण्यात आली. तसेच ग्रंथालयातील उपलब्ध सुविधा, वाचन पद्धती आणि संदर्भ शोधण्याच्या तंत्रांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध पुस्तकांचे अवलोकन केले आणि वाचनाविषयी आपली आवड व्यक्त केली.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित करत, “वाचन ही व्यक्तिमत्त्व विकासाची किल्ली असून ज्ञान, विचारसंपदा आणि सर्जनशीलता वाढविण्याचे प्रभावी साधन आहे,” असे सांगितले. विद्यार्थ्यांनी दररोज थोडा वेळ वाचनासाठी द्यावा आणि ग्रंथालयाचा अधिकाधिक उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी यांनी उत्कृष्ट वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष पारितोषिक जाहीर केले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा अधिक वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. दिनेश जोशी, डॉ. सुधीर गाडवे, प्रा. दशरथ ननावरे, प्रा. विलास कोमटवाड, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. मनोज गवरे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला अधिक उंची प्राप्त झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथपाल डॉ. अपर्णा पसाररकर, श्रीकांत जोशी आणि गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होऊन ज्ञानार्जनाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल उचलले गेले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



# दयानंद शिक्षण संस्थेच्या कला महाविद्यालयाचा बारावी बोर्ड 2026 परीक्षेत निकालाची उज्ज्वल परंपरा कायम

फेब्रुवारी/मार्च 2026 मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेत दयानंद कला महाविद्यालयाने नेत्रदीपक यश संपादन केले. शै. वर्ष 2025-26 मध्ये इयत्ता 12 वी बोर्ड परीक्षेस एकुण 371 विद्यार्थी प्रवेशीत होते. पैकी 362 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी 312 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. महाविद्यालयाचा एकूण निकाल 86.18% लागला असून कु. शरयु गणेश कुलकर्णी -94.33% गुण घेऊन महाविद्यालयात सर्वप्रथम आली आहे. कु.गायत्री विजय साखरे – 90%, गुण घेऊन द्वितीय कु. अनुजा सुग्राम कसपटे- 88.33% गुण घेऊन तृतीय आली आहे.

विशेष प्राविण्यासह – 07, प्रथम श्रेणी- 103, द्वितीय श्रेणी- 132, तृतीय श्रेणी-68 विद्यार्थी आले आहेत. महाविद्यालयातील 85.00% पेक्षा अधिक गुण संपादन करणारे विद्यार्थी खालील प्रमाणे आहेत.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष तथा शालेय समिती अध्यक्ष श्री. ललितभाई शहा, सचिव श्री. रमेश बियाणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दिक्षित परीक्षा विभाग प्रमुख प्रा. जिगाजी बुद्रुके, सदस्य प्रा. दशरथ ननवरे व डॉ. सुधीर गाडवे तसेच डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. दिनेश जोशी, डॉ. गोपल बाहेती, प्रा. विलास कोमटवाड, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. मनोज गवरे, प्रा. अनिल भुरे, प्रा. महेश जंगापल्ले, प्रा. रत्नाकर केंद्रे, कार्यालयीन अधिक्षक श्री. संजय व्यास, श्री. रामकिशन शिंदे, श्री. सचिन वांगसकर, श्री. बालाजी शिंदे इतर प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी आदिंनी अभिनंदन केले.





गांवकरी
www.gavakari.net
05 May 2026 - Page 6

## दयानंद कला महाविद्यालयाचा बारावी बोर्ड परीक्षेत यशाची परपंरा कायम

लातूर/प्रतिनिधी

फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेत दयानंद कला महाविद्यालयाने नेत्रदीपक यश संपादन केले. या यशाबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

या परीक्षेस एकूण ३७१ विद्यार्थी प्रवेशीत होते. पैकी ३६२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी ३१२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. महाविद्यालयाचा एकूण निकाल ८६.१८ टक्के लागला असून कु. शरयु गणेश कुलकर्णी (९४.३३) सर्वप्रथम आली आहे. कु. गायत्री विजय साखरे (९०) द्वितीय, कु. अनुजा सुग्राम कसपटे (८८.३३) गुण घेऊन तृतीय आली आहे. तर विशेष प्राविण्यासह - ७, प्रथम श्रेणी- १०३, द्वितीय श्रेणी- १३२, तृतीय श्रेणी-६८ विद्यार्थी आले आहेत. महाविद्यालयातील ८५ टक्के पेक्षा अधिक गुण संपादन करणारे विद्यार्थी पुढील प्रमाणे आहेत. त्यात कु. शरयु गणेश कुलकर्णी (९४.३३), कु. गायत्री विजय साखरे (९०), कु. अनुजा सुग्राम कसपटे (८८.३३), कु. श्रुति सिध्दार्थ सुर्यवंशी (८८.१७), चि. दत्ता राम धोत्रे (८७.३३), चि. रितेश बळीराम सर्जे(८६.६७), कु. साक्षी सिध्देश्वर गोरे (८६.५०%), चि. ओमकार सूर्यकांत गवळे (८६.५०), कु. संस्कृति रावसाहेब समुद्रे (८५.), कु. पौर्णिमा कुलिंद मस्के (८५ टक्के) यांचा समावेश आहे.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष तथा शालेय समिती अध्यक्ष ललितभाई शहा, सचिव रमेश बियाणी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दिक्षित, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. जिगाजी बुद्रुके, सदस्य प्रा. दशरथ ननवरे व डॉ. सुधीर गाडवे, डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. दिनेश जोशी, डॉ. गोपल बाहेती, प्रा. विलास कोमटवाड, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. मनोज गवरे, प्रा. अनिल भुरे, प्रा. महेश जंगापल्ले, प्रा. रत्नाकर केंद्रे, कार्यालयीन अधिक्षक संजय व्यास, रामकिशन शिंदे, सचिन वांगसकर, बालाजी शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे.

# पुरोगामी विचारांचा वारसा अन् संशोधकाची प्रज्ञा; डॉ. रमेश पारवे यांचा इतिहास विभागप्रमुख पदापर्यंतचा अलौकिक प्रवास;

पुरोगामी विचारांचा वारसा अन् संशोधकाची प्रज्ञा; डॉ. रमेश पारवे यांचा इतिहास विभागप्रमुख पदापर्यंतचा अलौकिक प्रवास; दयानंद कला महाविद्यालयातर्फे सेवापूर्ती निमित्त गौरव!
येथील दयानंद कला महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. रमेश पारवे यांचा ३३ वर्षांच्या प्रदीर्घ आणि निष्कलंक सेवेनंतर भावपूर्ण निरोप समारंभ पार पडला. ३० एप्रिल २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने डॉ. रमेश पारवे, त्यांच्या पत्नी सौ. शांता पारवे व चिरंजीव शशिकांत पारवे यांचा यथोचित सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. यावेळी उपप्राचार्य डॉ.अंजली जोशी, IQAC समन्वयक डॉ. संतोष पाटील, स्वरातीम विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ.डी.एन.मोरे पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. रमेश पारवे यांचा प्रवास अत्यंत खडतर आणि प्रेरणादायी राहिलेला आहे. अगदी दगड ओढण्याच्या कामापासून कष्ट करत त्यांनी महाराष्ट्रातील नामांकित दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद कला महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख पदापर्यंत मजल मारली. आपल्या ३३ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी अध्यापन आणि संशोधनाशी कधीही तडजोड केली नाही. एक अभ्यासू व्यक्तिमत्व, इतिहासाचे गाढे अभ्यासक आणि प्रभावी वक्ते म्हणून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या कार्याची छाप पाडली आहे.

आपल्या निरोपपर भाषणात डॉ. रमेश पारवे भावूक झाले. "नोकरी लागताच वडिलांचे छत्र हरवले, पण संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी पेलत सामाजिक चळवळीतही स्वतःला झोकून दिले," अशा शब्दांत त्यांनी आपला जीवनपट उलगडला. त्यांच्या या प्रवासात त्यांनी नाती जपण्याला आणि कष्टाला सर्वोच्च स्थान दिले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड म्हणाले की, "दयानंद महाविद्यालयाचा शैक्षणिक व पुरोगामी विचारांचा वारसा आहे आणि डॉ. रमेश पारवे यांनी हा वारसा खऱ्या अर्थाने समृद्ध केला आहे. आंबेडकरी विचारांचे बीज समाजात पेरण्याचे आणि चळवळीला दिशा देण्याचे काम त्यांनी आपल्या लेखणीतून आणि वाणीतून केले. संघर्षातून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाकडून तरुणांनी जिद्द आणि चिकाटी शिकली पाहिजे."

याप्रसंगी प्रा. अमोल शिंदे, डॉ. बालाजी घुटे, डॉ. प्रदीप सूर्यवंशी, डॉ. अंकुशकुमार चव्हाण, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. स्वप्नील जाधव, प्रा. विलास कोमटवाड आणि उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनीही डॉ. रमेश पारवे यांच्या कार्याचा गौरव केला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरेश क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रा. राजू मोरे यांनी मानले.

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 8
01 May 2026



# प्रा. डॉ. रमेश पारवे यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

लातूर : प्रतिनिधी

दयानंद कला महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. रमेश पारवे यांचा ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३० एप्रिल २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने डॉ. रमेश पारवे, त्यांच्या पत्नी सौ. शांता पारवे व चिरंजीव शशिकांत पारवे यांचा यथोचित सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, डॉ. संतोष पाटील, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. प्रशांत दीक्षित, संजय व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांची निरोपपर भाषणे झाली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केला. याप्रसंगी प्रा. अमोल शिंदे, डॉ. बालाजी घुटे, डॉ. प्रदीप सूर्यवंशी, डॉ. अंकुशकुमार चव्हाण, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. स्वप्नील जाधव, प्रा. विलास कोमटवाड आणि उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनीही डॉ. रमेश पारवे यांच्या कार्याचा गौरव केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरेश क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रा. राजू मोरे यांनी मानले.









# मासिक ई-मॅगझीन

**महिना : एप्रिल २०२६**

**संपर्क**

**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**

**ईमेल : daclatur@rediffmail.com वेबसाईट : www.daclatur.org**

**आभार**

**या ई-मॅगझीनच्या निर्मितीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार.**